आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१५ ऑगस्ट २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- जीएसटी मधे येत्या दिवाळीत सुधारणा करण्याची प्रधानमंत्र्यांची घोषणा

- एकोणऐंशीव्या स्वातंत्र्यदिनाचा देशभरात उत्साह / राज्याराज्यात ध्वजारोहणाचे कार्यक्रम / देशोदेशी भारतीय दूतावासातही स्वातंत्र्यदिनानिमित्त कार्यक्रम

- उत्तम शिक्षण आणि मनुष्यबळ विकासाच्या जोरावर महाराष्ट्र देशाच्या विकासाचे नेतृत्व करेल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास

**आणि**

- जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात ढगफुटीच्या बळींची संख्या ४५

**<><><><>**

येत्या दिवाळीत जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर प्रणालीत सुधारणा करण्यात येईल, अशी घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. एकोणऐंशीव्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी दिल्लीत लाल किल्ल्यावर ध्वज आरोहित केल्यानंतर ते बोलत होते. जीएसटी लागू होऊन आठ वर्षे झाली असून आता या प्रणालीचा फेरआढावा घेण्याची वेळ आली आहे, असं ते म्हणाले.

- **- होल्ड बाईट मोदी - -**

जीएसटी सुधारणा केल्यावर नागरिकांवरचा कराचा भार कमी होईल, लघु उद्योगांना लाभ होईल, तसंच दैनंदिन वापराच्या वस्तू स्वस्त होतील, असं प्रधानमंत्री म्हणाले.

ऑपरेशन सिंदूरमधे कर्तृत्व गाजवणाऱ्या सैनिकांचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी कौतुक केलं. देशाला व्यथित करणाऱ्या पहलगाम हल्ल्याचं प्रत्युत्तर ऑपरेशन सिंदूरद्वारे दिलं, असं प्रधानमंत्री म्हणाले. सरकारने सैन्याला पूर्ण स्वातंत्र्य दिलं होतं, भारतीय सैनिकांनी पाकिस्तानात शेकडो किलोमीटर घुसून दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले, असं ते म्हणाले. भारताने यापुढं दहशतवाद्यांना सडेतोड उत्तर देण्याचा निर्णय घेतला आहे, असा इशारा त्यांनी दिला. अण्वस्त्रांच्या धमक्यांना आम्ही घाबरत नाही, असं मोदी यांनी सांगितलं. तसंच

देशाची सुरक्षायंत्रणा मजबूत करण्यासाठी मिशन सुदर्शन ही शक्तिशाली यंत्रणा विकसित करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

२१ वं शतक हे तंत्रज्ञानाचं शतक असून भारत यात वेगानं मार्गक्रमण करत असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. देशाला स्वावलंबी आणि विकसित बनवण्यासाठी सरकार कटिबद्ध असून विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आत्मनिर्भर होण्याची गरज प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली. त्यासाठी प्रत्येक क्षेत्रात आधुनिक परिसंस्था उभारण्याचं काम केलं जात असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. सेमिकंटक्टर क्षेत्रात देश प्रगती करत असल्याचं त्यांनी यावेळी आवर्जून सांगितलं. आतापर्यंत सहा सेमिकंडक्टर युनिट सज्ज होत असून चार नव्या युनिट्सनाही मान्यता दिल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. यावर्षी अखेर भारतात तयार केलेली चीप बाजारात येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अंतराळ संशोधन क्षेत्रात देशाने केलेल्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख प्रधानमंत्री मोदी यांनी केला. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे पहिले भारतीय, कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचं त्यांनी अभिनंदन केलं.

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेची महत्त्वपूर्ण घोषणा प्रधानमंत्र्यांनी आजच्या स्वातंत्र्यदिनी केली. सुमारे १ लाख कोटी रुपयांची तरतूद असलेली ही योजना देशभरात आजपासून लागू होईल. या अंतर्गत खाजगी क्षेत्रात पहिली नोकरी मिळवणाऱ्यांना सरकारकडून १५ हजार रुपये मिळतील असं त्यांनी सांगितलं.

शेतकऱ्यांच्या पशुपालकांच्या मच्छीमारांच्या हिताला तसंच वंचित वर्गाच्या हिताला सरकारचं प्राधान्य आहे, असं मोदी म्हणाले.

व्यक्ती निर्माणातून राष्ट्र निर्माणाचं कार्य करणाऱ्या आणि सेवा समर्पण आणि संघटन या संकल्पनेनुसार कार्यरत असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला या वर्षी शंभर वर्ष पूर्ण होत आहेत, त्या निमित्तान संघाच्या कार्याला त्यांनी वंदन केलं.

लाल किल्ल्यावर आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, इतर केंद्रीय मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि मोठ्या संख्येनं नागरिक उपस्थित होते.

**<><><><>**

राजधानी दिल्लीतल्या मुख्य कार्यक्रमासह देशभरात स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा होत आहे. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, डॉ. एस. जयशंकर, नितीन गडकरी, डॉ. जितेंद्र सिंह, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी शासकीय निवासस्थानी तिरंगा फडकावला. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी छत्रसाल स्टेडियम इथं ध्वजवंदन केलं.

**गुजरातमध्ये** मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी, तर **गोव्याचे** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी राष्ट्रध्वज फडकावला.

**कर्नाटकचे** मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी बेंगळुरू इथं, तर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी विजयवाडा इथं तिरंगा फडकावला.

**ओडिशाची** राजधानी भुवनेश्वर इथल्या मुख्य शासकीय कार्यक्रमात मुख्यमंत्री मोहन चरण माझी, तर **छत्तीसगडमध्ये** रायपूरच्या पोलीस परेड मैदानावर मुख्यमंत्री विष्णू देव साय यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

**बिहारचे** मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी पाटणा इथं, आणि **आसामची** राजधानी गुवाहाटी इथं मुख्यमंत्री हिमंत बिस्व शर्मा यांनी तिरंगा फडकावला.

**पंजाबमध्ये** मुख्यमंत्री भगवंत मान, **मध्य प्रदेशात** मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी राष्ट्रध्वज फडकावला.

**केरळमध्ये** मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी, तर **उत्तराखंडमध्ये** मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी तिरंगा ध्वज फडकावला.

**नागालँडचे** मुख्यमंत्री नेइफिऊ रिओ, **अरुणाचल प्रदेशचे** मुख्यमंत्री पेमा खांडू आणि **सिक्कीमचे** मुख्यमंत्री प्रेम सिंग तमंग यांच्या हस्ते त्या त्या राज्यांमधल्या मुख्य शासकीय कार्यक्रमांमध्ये ध्वजवंदन झालं.

**सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई** यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात ध्वजवंदन केलं.

**दिल्लीतल्या दोन्ही महाराष्ट्र सदनांमध्ये** निवासी आयुक्त आणि सचिव आर. विमला यांनी राष्ट्रध्वज फडकावला.

देशोदेशीच्या उच्चायुक्तालयांमध्येही भारतीय स्वातंत्र्यदिन मोठ्या साजरा होत आहे.

**बांगलादेशमधल्या** भारतीय उच्चायुक्तालयात उच्चायुक्त प्रणय वर्मा यांच्या हस्ते इथं ध्वजवंदन झालं.

**श्रीलंकेतले** भारताचे उच्चायुक्त संतोष झा यांनी कोलंबो इथं भारतीय शांतिसेना स्मारकावर पुष्पांजली अर्पण केली.

<><><><>

देशाच्या ७९व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त राज्यात मंत्रालय इथं मुख्य शासकीय सोहळा झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांना तसंच शहीद जवानांनाही आदरांजली वाहिली. जगातली सर्वोत्तम उत्पादनं भारतात तयार करण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं असल्याचं ते उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले. स्वदेशी उत्पादनांचा वापर करून आत्मनिर्भर भारताला बळकटी दिली जात आहे, देशात येत असलेल्या परदेशी गुंतवणुकीपैकी ४० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे, तसंच वस्तू निर्मिती, निर्यात आणि स्टार्ट-अप्समध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्याचं त्यांनी सांगितलं. उत्तम शिक्षण आणि मनुष्यबळ विकासाच्या जोरावर महाराष्ट्र देशाच्या विकासाचे नेतृत्व करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या भाषणातून त्यांनी प्रत्येक समाज घटकाचा तसंच पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केल्या जात असलेल्या कामांविषयी सांगितलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि संतांनी दाखवलेल्या वाटेवर महाराष्ट्र चालत राहील, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वर्षा या त्यांच्या निवासस्थानीही ध्वजारोहण झालं.

पुण्यात राजभवन इथंही ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रध्वज फडकावून तिरंग्याला मानवंदना दिली.

राज्यात मुंबईसह इतरत्रही ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाच्या आयोजन केलं गेलं. मुंबईत झालेल्या कार्यक्रमांविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी कडून….

**- - -व्हॉईस कास्ट - -**

*मुंबईत स्वातंत्र्यदिनाचा उत्साह जागोजागी दिसून येत आहे, हरघर तिरंगा अभियानाअंतर्गत अनेक निवासी वस्त्या आणि इमारतींवर तिरंगा डौलानं फडकत असल्याचं चित्र आहे, रस्त्यारस्त्यांवर आबाल-वृद्धांच्या हाती दिसणारा तिरंगा आणि जागोजागी देशभक्तीपर गीतांचे सूर कानी पडत असल्यानं अवघं वातावरण देशभक्तीनं भारलेलं आहे.*

*मुंबईत विधान भवन इथं विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते आणि ध्वजारोहण झालं. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि विधानपरिषदेचे विरोधीपक्षनेते अंबादास दानवे उपस्थित होते.*

*मुंबईत वर्ल्ड ट्रेड सेंटर इथं झालेल्या कार्यक्रमात विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी झेंडा फडकावला.*

*मुंबई उच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.*

*मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते ध्वजारोहण केलं गेलं, तर मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी राष्ट्रध्वज फडकावला.*

*मध्य रेल्वेच्या मुंबई इथल्या राष्ट्रीय मुख्यालयात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. पश्चिम रेल्वेच्या चर्चगेट इथल्या मुख्यालयातही ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक विवेक कुमार गुप्ता यांनी झेंडा फडवला.*

*आकाशवाणीच्या मुंबई केंद्रात झालेल्या कार्यक्रमात केंद्राचे उपमहासंचालक संजय बोदेले यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं… यावेळी त्यांनी श्रोत्यांपर्यंत माहिती पोहचवण्यासाठी आकाशवाणी करत असलेल्या प्रयत्नांबद्दल सांगितलं….*

***- - होल्ड - बाईट - -***

*याशिवाय मुंबईतली सर्व शासकीय आस्थापनं, विद्यापीठ तसंच शाळा महाविद्यालयं, गृहनिर्माण संस्थांमध्येही ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला.*

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूरमधल्या मुख्यालयात सरसंघचालक मोहन भागवत यांनी राष्ट्रध्वज फडकावून मानवंदना दिली.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात काल झालेल्या ढगफुटीमुळे किमान ४५ जणांचा मृत्यू झाला असून यात सीआयएसएफचे दोन कर्मचारी आणि मछैल माता यात्रेसाठी आलेल्या अनेकांचा समावेश आहे. आत्तापर्यंत वाचवण्यात आलेल्या शंभरपेक्षा जास्त जणांपैकी ३८ जणांची प्रकृती गंभीर आहे. असंख्य नागरिक अद्याप बेपत्ता असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, पोलीस, लष्कर आणि स्थानिकांच्या मदतीनं मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याशी संवाद साधला आणि परिस्थितीची माहिती घेतली.

**<><><><>**

पारसी नववर्ष दिन नवरोज आज साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या सणातून सर्वांना शांति आणि समृद्धी  तसंच राष्ट्र उभारणीत हातभार लावण्याची प्रेरणा मिळावी असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**//<><><><>//**